सचिन शिवाजी शिर्के, मंगळवेढा.

□ **डॉ. काशिनाथ घाणेकर यांनी कोणकोणत्या मराठी चित्रपटात नायकाची भूमिका केली?**

— *पाहू रे किती वाट, सुखाची सावली, मराठा तितुका मेळवावा, पाठलाग, धर्मपत्नी, पडछाया, लक्ष्मी आली घरा, मधुचंद्र, एकटी, प्रित शिकवा मला, मानला तर देव, घर गंगेच्या काठी, देव माणूस, झेप, अन्नपूर्णा, चंद्र होता साक्षीला, गारंबीचा बापू, अजब तुझे सरकार, हा खेळ सावल्यांचा.*

दीपक सुभाष दीक्षित, पंढरपूर.

□ **चित्रपटातील नायक-नायिकेचा आवाज सुरूवातीलाच टेप केला जातो की नंतर?**

— केवळ नायक-नायिकेलाच नव्हे तर चित्रपटातील प्रत्येक कलावंताला शूटिंगच्या वेळीच आपले संवाद बोलावे लागतात आणि तेव्हा त्यांचे रेकॉर्डिंगदेखील होते. या रेकॉर्डिंगमध्ये अनेक त्रुटी राहतात. त्या दूर करण्यासाठी प्रत्येक कलावंताच्या संवादाचे नंतर डबिंग केले जाते.

कल्पना वरूणकर, खारेपाटण.

□ **किशोरकुमार आधी पार्श्वगायक बनला की अभिनेता?**

— १९४८च्या *जिद्दी*द्वारा किशोरकुमार आधी पार्श्वगायक बनला व १९५१च्या *आंदोलन*द्वारा नायक.

मानसी कोळेकर, परेल.

□ **यश चोप्रा, सुभाष घई व यश जोहर यांनी निर्माण केलेला पहिला चित्रपट कोणता?**

— अनुक्रमे *दाग, हिरो, दोस्ताना.*

मनोज सुरेश सोनवणे, चोपडा.

□ **पृथ्वीराज कपूर ते करिश्मा कपूर पर्यंत कपूर घराण्यातील कोणकोणते कलाकार चित्रपटात आले?**

— पृथ्वीराज कपूर, त्रिलोक कपूर, कमल कपूर, राज कपूर, शम्मी कपूर, शशी कपूर, रणधीर कपूर, ऋषी कपूर, संजना कपूर, राजीव कपूर, कुणाल कपूर, करण कपूर, करिश्मा कपूर आणि आता करिना कपूर.

कुमार कबडे, बार्शी.

□ **भारतीय चित्रपटाचे बाह्यचित्रण परदेशात होते, त्याचप्रमाणे परदेशातील चित्रपटांचे चित्रण भारतात होते काय?**

— *मान्सून, भवानी जंक्शन, बॉम्बे टॉकीज, शालीमार, द हाऊस होल्डर* यासारख्या अनेक चित्रपटांचे बाह्यचित्रण आतापर्यंत भारतात झाले आहे.

रोमेश भंडारी, वास्को-द-गामा.

□ **डी. बिलमोरिया व इ. बिलमोरियानी कोणकोणत्या चित्रपटात भूमिका केल्या?**

— डी. बिलमोरिया मूकपट जमान्यात *लाबेली* या चित्रपटाद्वारा नट बनले. आणि त्यानंतर *द नर्स, अनारकली, माधुरी, कातिल कथनी, व्हेन जेन्स, फ्लाईंग प्रिन्स, हीर रांजा, ज्वेल ऑफ राजपूत, जादूरी बंसरी, पंजाब मेल, राजपुतानी, माय डार्लिंग, रोमान्स ऑफ राधा, वाईल्ड फ्लॉवर, डेझर्ट डॅम्सल, ड्रिम्स ऑफ लव्ह, हूर-ए-रोशन, क्वीन ऑफ लव्ह, शिरीन ऑफ बगदाद* या मूकपटात व *देवी देवयानी, सती मदालसा, डाकू की लडकी, सौभाग्य सुंदरी, सुलोचना, इंदिरा एम. ए. गुल सनोवर, पिया प्यारे, अनारकली, दो घडी की मौज, पुजारीन, टेंपल बेल्स, जंगल क्वीन, जगत केसरी, प्रेम की ज्योत, न्यू सर्च लाईट, वाहरी दुनिया, कॉक ऑफ युथ* या बोलपटात भूमिका केल्या. नंतर अमेरिकेला जाऊन ध्वनीमुद्रणाचे शिक्षण त्यांनी घेतले आणि शेवटपर्यंत ध्वनीमुद्रक म्हणून ते सन्मानाने जगले. ई. बिलमोरिया मूकपट जमान्यात *पंजाब मेल* या चित्रपटाद्वारा पडद्यावर आले. त्यानंतर त्यांनी *अ फ्रेन्ड इन नीड, चॅलेंज, गुलशन ए अरब, रेड सिग्नल, व्हॅनिशिंग हीट्स, बॉम्बे द मिस्टीरियस, प्रिन्स चार्मिंग, मिल्क मेड, रॉयल रोमान्स, लाल स्वार सिपाह सालार* या मूकपटात व *चार चक्रम, भोला शिकार, मिस १९३३, गुणसुंदरी, विश्वमोहिनी, परदेसी प्रीतम, काश्मिरा, सितमगर, तुफानी तरूणी, तुफान मेल, बॅरिस्टर्स वाईफ, तारा सुंदरी, वीर बबवाह, देशदासी, किमती आसू, नेक वतन, लहरी लाला, प्रभू का प्यारा, राज रमनी, रंगीला राजा, सिपाही की सजनी, परदेसी पनखी, मिट्टी का पुतला, तुफानी टोली, बन की चिडीया, बिल्ली, पृथ्वीपुत्र, प्रोफेसर वामन एम. एस. सी., थंडर, निराली दुनिया, स्नेहबंधन, ढंढोरा, मेरे राजा, किसकी बिवी, स्वप्ना, दुनिया दीवानी, कातिल बेटी, परदेसी, ज्योती प्यास, चिंगारी, सखी, चमकती बिजली, नेहले पे देहला* या बोलपटात चमकले. शेवटच्या काळात ते एक्स्ट्राच्या गर्दीत दिसायचे. *कल आज और कल, रामपूर का लक्ष्मण* यासारख्या अनेक चित्रपटात ते एक्स्ट्रांच्या गर्दीत होते. ●

वैभव के. ढगे, इचलकरंजी.

□ **चानीनंतर रंजनाने कोणकोणत्या चित्रपटात भूमिका केल्या?**



झंझारमध्ये पद्मिनी कोल्हापुरेसह रंजना

— *कलावंतीण, लक्ष्मी, सासुरवाशीण, सुशिला, बाईलवेडा, दुनिया करी सलाम, ग्यानबाची मेख, हळदीकुंकू, भालू, हीच खरी दौलत, नागीण, पाटलीण, तमासगीर, आव्हान, भुजंग, दैवत, एक डाव भुताचा, गल्ली ते दिल्ली, लक्ष्मीची पाऊल, बायको असावी अशी, गुपचुप गुपचुप, हे दान कुंकवाचे, कशाला उद्याची बात, मर्दानी, सासू वरचढ जावई, सावित्री, आली लहर केला कहर, बहुरूपी, बिन कामाचा नवरा, चव्हाटा, जख्मी वाघीण, कुलस्वामिनी अंबाबाई, मुंबईचा फौजदार, खिचडी, हिचं काय चुकलं, झंझार.*

विजेता प्रश्न

कृ. प. काणे, वाशी.

□ **सुधीर फडकेंनी एखाद्या हिंदी चित्रपटाला संगीत दिले आहे काय?**

— गोकुल, रूक्मिणी स्वयंवर, आगे बढो, सीता स्वयंवर, अपराधी, माया बाजार, संत जनाबाई, राम प्रतिज्ञा तथा सीता हरण, श्रीकृष्ण दर्शन, मालती माधव, मुरलीवाला, पहली तारीख, रत्नघर, गजगौरी, गोकुल का चोर, भाभी की चुडियाँ, प्यार की ज्योत, दरार, शेर शिवाजी या हिंदी चित्रपटांना सुधीर फडके यांनी संगीत दिले. यापैकी गोकुल, आगे बढो, अपराधी राम प्रतिज्ञा तथा सीता हरण, मालती माधव, मुरलीवाला, पहली तारीख, रत्नघर, गजगौरी, गोकुल का चोर, भाभी की चुडियाँ, दरार, शेर शिवाजी हे चित्रपट पूर्णपणे हिंदीत होते. बाकीचे चित्रपट हिंदीबरोबर मराठीत देखील निर्माण झाले होते.